RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ९१

दि.३० जुलै २०२६, वार : गुरूवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# 'एसआयआर' मोहिमेतील गोंधळाबाबत काँग्रेसची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

## त्रुटी दूर करून मुदतवाढ देण्याची जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांची मागणी



**लातूर/ प्रतिनिधी:** राज्याचे माजी मंत्री तथा विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासरावजी देशमुख यांच्या सूचनेनुसार, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने भारत निवडणूक आयोगामार्फत सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण (डखठ - डशिलळरश्र खपींशपीळींश ठर्शींळीळेप) अभियानामध्ये येणाऱ्या विविध अडचणी आणि त्रुटींसंदर्भात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना सविस्तर निवेदन देण्यात आले.

या मोहिमेतील त्रुटी दूर कराव्यात आणि एकाही पात्र मतदाराला त्याच्या मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवले जाणार नाही, याची दक्षता घेण्याची आग्रही विनंती प्रशासनाला करण्यात आली. या मोहिमेत मतदार, बूथ लेव्हल एजंट (इङ-) आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रभेटीदरम्यान येणाऱ्या गंभीर अडचणी निदर्शनास आणून देत तातडीने सुधारणा करण्याची काँग्रेसची मागणी आहे. हे निवेदन देताना काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके आणि लातूर विधानसभा एसआयआर मोहिमेचे प्रमुख तसेच प्रदेश सचिव डॉ. दिनेश नवगिरे, संजय ओहाळ, विठ्ठल पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या निवेदनात प्रशासनाच्या कामकाजातील अनेक त्रुटींवर बोट ठेवण्यात आले आहे.

एसआयआर प्रक्रियेबाबत पुरेशी जनजागृती न झाल्याने अनेक मतदारांना ईएफ (एऋ) फॉर्म भरण्याचे महत्त्वच समजलेले नाही. तसेच, बीएलओ (इङज) यांच्या घरभेटीसाठी कोणतीही निश्र्चित वेळ ठरलेली नसल्यामुळे नोकरदार, कामगार, शेतकरी आणि विद्यार्थ्यांशी संपर्क साधणे अत्यंत कठीण जात आहे.

अनेक भाडेकरू व स्थलांतरित नागरिकांची नावे 'अनमॅप्ड' (णपारिंशिव) यादीत असल्याने त्यांच्यापर्यंत पोहोचण्यात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. याव्यतिरिक्त, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, गंभीर आजारी आणि अंथरुणाला खिळलेल्या व्यक्तींसाठी कोणतीही विशेष सुविधा किंवा पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून दिलेली नाही. बीएलओंच्या कामातही एकवाक्यता नसून, काही जण घरोघरी जाऊन तर काही एकाच ठिकाणी बसून काम करत असल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. एकाच कुटुंबातील सर्व सदस्यांचे ईएफ फॉर्म उपलब्ध न होणे, कागदपत्रे नसलेल्या वयोवृद्ध व वंचित नागरिकांसाठी स्पष्ट मार्गदर्शक सूचनांचा अभाव, आणि 'अनोमॅलीज' (-पोरश्रळशी) यादीतील दुरुस्तीबाबत बीएलओंमध्येच असलेली संभ्रमावस्था यांसारख्या गंभीर बाबींवर काँग्रेसने चिंता व्यक्त केली आहे.

या सर्व परिस्थितीच्या पार्श्र्वभूमीवर काँग्रेस कमिटीने प्रशासनाकडे काही प्रमुख मागण्या केल्या आहेत. लातूर शहरातील प्रत्येक प्रभागात आणि गावनिहाय तीन दिवसीय मतदार गणना आणि त्रुटी दुरुस्ती शिबिरे आयोजित करून प्रशासनाने याबाबत व्यापक जनजागृती करावी, तसेच सर्व पात्र मतदारांना ही प्रक्रिया पूर्ण करता यावी यासाठी एसआयआर अभियानाला आवश्यक तेवढी मुदतवाढ देण्यात यावी, अशी जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी मागणी केली. ईएफ फॉर्म, आवश्यक कागदपत्रे आणि दुरुस्ती प्रक्रियेबाबत जिल्हाभर एकसमान व स्पष्ट मार्गदर्शक सूचना तातडीने प्रसिद्ध कराव्यात. ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी विशेष सुलभ व्यवस्था निर्माण करावी, गर्दीच्या शहरी भागात अतिरिक्त मनुष्यबळ पुरवावे, आणि चुकीच्या मॅपिंगची प्रकरणे तातडीने दुरुस्त करून मतदारांचे हक्क अबाधित ठेवावेत. ज्यांना फॉर्म उपलब्ध झालेले नाहीत त्यांना कोरे (इश्ररपज्ञ) फॉर्म उपलब्ध करून द्यावेत, आणि बीएलए (इङ-) यांना रंगीत छायाचित्रे असलेली मतदार यादी विनामूल्य पुरवावी, अशीही काँग्रेसची मागणी आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांचे सकारात्मक आश्वासन**

काँग्रेसच्या या शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे मांडलेल्या सर्व समस्या आणि मागण्यांवर जिल्हाधिकाऱ्यांनी अत्यंत सकारात्मक भूमिका घेतली. चर्चेदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी निवेदनातील अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर सहमती दर्शवली असून, या त्रुटी दूर करण्यासाठी आणि मोहिमेत सुसूत्रता आणण्यासाठी आवश्यक ते आदेश व परिपत्रके लवकरच निर्गमित करण्यात येतील, असे ठोस आश्र्वासन त्यांनी दिले. प्रशासनाच्या या सकारात्मक प्रतिसादामुळे मतदारांची होणारी गैरसोय दूर होऊन प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनाविषयक १ ऑगस्ट रोजी लातूर येथे विशेष कार्यशाळा



**लातूर/ प्रतिनिधी:** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा अर्ज भरलेल्या व विहीत मुदतीत कागदपत्रांची पूर्तता केलेल्या पात्र विद्यार्थ्यांना तात्काळ लाभ वितरीत करण्याच्या दृष्टीने, तसेच सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी महाआयटी पोर्टलवर नवीन वसतिगृह प्रवेश अर्ज भरताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे त्वरित निराकरण करण्यासाठी येत्या शनिवार, दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृहात ही कार्यशाळा होणार असून, पात्र व अडचणी असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समाज कल्याण, लातूरचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

## १ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद शाळा केज येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त वृक्षारोपण कार्यक्रम




**केज/प्रतिनिधी :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंती निमित्त १ऑगस्ट २०२६ रोजी ठीक सकाळी १२-०० वाजता केज शहरातील जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन हे बहुजन जेष्ठ नागरिक मंच यांच्या वतीने करण्यात आले आहे. या वृक्षारोपण कार्यक्रमास तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, केज नगरपंचायतचे मुख्याधिकारी अजित ढोपे पंचायत समिती चे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, गटशिक्षणाधिकरी सुनिल केंद्रे, वनविभागाचे वनपरिक्षक अधिकारी व कर्मचारी व सर्व पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित राहाणार आहेत. तरी केज शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, जेष्ठ नागरिक, महिला, युवा कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे असे आवाहान संयोजन समितीचे बाबुराव गालफाडे सर, सय्यद शकील,डि.के. जाधव, दगडू तात्या गालफाडे, मदन जोगदंड,रमेश पाटोळे, इरफान पठाण,अजय गालफाडे,अनिल लोखंडे, साहिल तांबोळी, शहाजी जाधव,वैजेनाथ क्षीरसागर, बालासाहेब गालफाडे, विनायक लोंढे यांच्या समाज बांधवाच्या वतीने करण्यात आले आहे.

## पाकव्याप्त काश्मीर निवडणुकांवर भारताचा पाकिस्तानला खरमरीत इशारा! हा बेकायदेशीर ताबा लपवण्याचा केवळ बनाव

नवी दिल्ली : पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीर मध्ये आयोजित केलेल्या कथित विधानसभा निवडणुकांवर भारताने पुन्हा एकदा कठोर भूमिका घेतली आहे. या निवडणुकांचा भारताने तीव्र निषेध करत, हा संपूर्ण प्रकार पाकिस्तानच्या बेकायदेशीर ताब्याला वैधतेचा आभास निर्माण करण्याचा निष्फळ प्रयत्न असल्याचे स्पष्ट केले आहे.

## दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अण्णाभाऊ साठे नगर दिघा येथे नवीन शाखा नवीन बांधणी



**नवी मुंबई / के. एच. हनवते :** भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा अंतर्गत अण्णा भाऊ साठे नगर दिघा येथे नवी मुंबई जिल्ह्याचे अध्यक्ष : विजय झनके गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार दिनांक २३ / ०७ / २०२६ रोजी दिघा येथे नवी मुंबई जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पारदर्शकरित्या नवीन भारतीय बौद्ध महासभा शाखेची बांधणी करण्यात आली.

प्रथम आदर्शांची पुजा करण्यात आली व सामुहिक त्रिसरण पंचशील घेण्यात आले. त्यानंतर जिल्हा पदाधिकाऱ्यांना सन्मानीत करण्यात आले. जिल्हाध्यक्ष : विजय झनके गुरुजी यांनी प्रथम शाखा बांधणी कशासाठी ? याचे थोडक्यात महत्व विशद केले. आणि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया या मातृसंस्थेच्या माध्यमातून समाजामध्ये धम्माचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी प्रत्येक वॉर्ड,गाव आणि विभागांमध्ये शाखा निर्माण झाली पाहिजे. संस्थेच्या २४ शिबिराच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटक हा शिलवान गुणवान व प्रज्ञावान होतो.असे विशद केले.

दिघा येथील नवनियुक्त कार्यकारिणीची घोषणा करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्यात. आयु. प्रकाश माने गुरुजी (कोषाध्यक्ष) आदरणीय प्रकाश भालेराव गुरुजी ( उपाध्यक्ष - संस्कार ) यांनी नवीन कार्यकारिणीला धम्मकार्य करण्यासाठी शुभेच्छा दिल्यात ! नंतर नवनियुक्त कार्यकारिणीचे अध्यक्ष रंगनाथ घुसळे आणि सरचिटणीस कमलबाई तुरुकमाने कोषाध्यक्ष अतुल अंकुश यांनी आपले मनोगत व्यक्त केले. उपस्थित जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या हस्ते नवनियुक्त कार्यकारिणीचा सत्कार करण्यात आला. शाखा बांधणी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन रंगनाथ घुसळे यांनी केले. या कार्यकारणी साठी धम्मशील बुद्ध विहार कमिटीच्या सर्व पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले. त्यांचे सुद्धा मनापासून अभिनंदन. आणि मंगलमय हार्दिक शुभेच्छा.

## डॉ.शिवलिंग नागापुरे यांचा पीएच.डी.पदवीबद्दल आमदार विक्रम काळे यांनी केला सन्मान



**लातूर/ प्रतिनिधी:** जिल्हा परिषद कन्या प्रशाला भादा, ता. औसा येथील महाराष्ट्र शासन राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ.शिवलिंग उमाकांत नागापुरे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेंतर्गत शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी.(डॉक्टरेट) पदवी प्राप्त झाली आहे,त्याबद्दल मराठवाडा विभागाचे शिक्षक आमदार विक्रमबप्पा काळे साहेब यांनी डॉ.शिवलिंग नागापुरे यांच्या घरी जाऊन त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले आहे.

डॉ.शिवलिंग नागापुरे यांनी स्वामी विवेकानंद अध्यापक महाविद्यालय उदगीरचे प्राचार्य डॉ.गोपाळ पवार सर यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केलेल्या ''लातूर जिल्ह्यात इंस्पायर अवार्ड्स मानक योजनेमुळे विद्यार्थ्यांत विकसित होणारी संशोधनवृत्ती, सृजनशिलता व सामाजिक उपयोगितेचा अभ्यास'' या संशोधन प्रबंधास मान्यता मिळून पीएच.डी.पदवी प्राप्त झाली आहे.

डॉ.शिवलिंग नागापुरे यांनी भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या इंस्पायर अवार्ड्स मानक योजनेशी संबंधित संशोधन कार्य पूर्ण केले आहे.ह्या योजनेशी यापूर्वी देशात पीएच. डी. स्तरावर फक्त एकच संशोधन झाले असून डॉ.नागापुरे यांचे या योजनेशी संबंधित देशातील दुसरे तर महाराष्ट्रातील पहिले संशोधन कार्य आहे. डॉ.शिवलिंग नागापुरे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल छत्रपती संभाजीनगर(मराठवाडा) विभागाचे शिक्षक आमदार तथा मुख्य प्रतोद (कॅबिनेट मंत्री दर्जा) विधानपरिषद विक्रमबप्पा काळे यांनी डॉ.नागापुरे यांच्या संशोधन विषयाची माहिती जाणून घेऊन त्यांचा सन्मान केला आणि अभिनंदन केले. तसेच डॉ.नागापुरे यांनी त्यांच्या प्रबंधात शासनासाठी सुचविलेल्या शिफारसी अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले जातील असे आमदार काळे साहेब यांनी सांगितले.

यावेळी राजकुमार जाधव सर, प्रा. विवेकानंद ढगे, प्रा संभाजी नवघरे, प्रा. सिद्धलिंग गुजर, विकास सरकाळे, बाबासाहेब भिसे, किरणकुमार रायते, पद्माकर आतकरे आणि डॉ.नागापुरे यांच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते.

# गुरुपौर्णिमेनिमित्त पं.पू. विद्यानंद सागर महाराज यांचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी घेतले आशीर्वाद

**लातूर/ प्रतिनिधी:** गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त भाजपचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी गातेगाव येथील राधाकृष्ण अध्यात्म आश्रम येथे पं.पू. विद्यानंद सागर महाराज यांची भक्तिभावाने भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी महाराजांचा यथोचित सत्कार करून गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

गुरुपौर्णिमा हा भारतीय संस्कृतीतील पवित्र दिवस. जीवनाला योग्य दिशा, संस्कार आणि मूल्यांची शिकवण देणाऱ्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस यानिमित्ताने लातूर तालुक्यातील मौजे गातेगाव येथील राधाकृष्ण अध्यात्म आश्रमातील पं.पू. विद्यानंद सागर महाराज यांचे आश्रम येथे जाऊन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी महाराजांचे दर्शन घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी महाराजांचा पांडुरंगाची मूर्ती, पुष्पहार, शाल देऊन सन्मानपूर्वक सत्कार केला. महाराजांच्या मार्गदर्शनातून समाजात आध्यात्मिक, नैतिक आणि सामाजिक मूल्यांची जपणूक होण्यास प्रेरणा मिळते, अशी भावना व्यक्त करून आ. रमेशआप्पा कराड यांनी गुरूंचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन हे समाज जीवनाला सकारात्मक दिशा देणारे असल्याचे नमूद केले.

यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांच्यासमवेत भाजपा किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ज्येष्ठ मार्गदर्शक नागसिंह देशमुख मालक, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, पद्माकर चिंचोलकर, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, विशाल जाधव, राजकिरण साठे, भैरवनाथ पिसाळ, बाबासाहेब भिसे, किरण मुंडे, ॲड. धनराज शिंदे, समाधान अडगळे, बालाजी गवळी, संजय सूर्यवंशी, सुधाकर पाटील, अंकुश गणगे, नानासाहेब भिसे, श्रीकृष्ण मुळे यांच्यासह अनेक जण होते.



## संपादकीय...


### अमित शहा यांचा राजीनामा होणार का? आता प्रश्न केवळ एका मंत्र्याचा नाही, तर जबाबदारीचा आहे!

देशाच्या राजकारणात सध्या एक प्रश्न पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहेकेंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा राजीनामा होणार का? शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आता विरोधकांकडून गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. विशेषतः विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या पोलिस कारवाईच्या पार्श्वभूमीवर ही मागणी पुढे आली आहे. मात्र, आजच्या घडीला अमित शहा यांच्या राजीनाम्याबाबत केंद्र सरकार किंवा भाजपकडून कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर सत्ताधारी पक्षाने हा निर्णय राष्ट्रहित आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याला प्राधान्य देणारा असल्याचे सांगितले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही प्रधान यांच्या राजीनाम्याचे समर्थन करताना पक्षासाठी देश, युवक आणि विद्यार्थी हे कोणत्याही पदापेक्षा महत्त्वाचे असल्याचे म्हटले. पण हाच निकष जर सर्व मंत्र्यांसाठी समान असेल, तर मग जबाबदारीचा प्रश्न अमित शहा यांच्यापर्यंत पोहोचतो का, हा प्रश्न विरोधक उपस्थित करीत आहेत. लोकशाहीमध्ये कोणताही मंत्री हा पदापेक्षा मोठा नसतो. मंत्रीपद ही सत्ता उपभोगण्याची संधी नसून जनतेसमोर उत्तरदायित्व स्वीकारण्याची जबाबदारी असते. त्यामुळे एखाद्या मंत्रालयाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले, तर त्या प्रश्नांची उत्तरे देणे ही संबंधित मंत्र्यांची घटनात्मक आणि नैतिक जबाबदारी आहे. राजीनामा मागणे हा विरोधकांचा अधिकार आहे; मात्र राजीनामा स्वीकारणे किंवा न स्वीकारणे हा निर्णय पंतप्रधान आणि संबंधित मंत्र्यांच्या राजकीय जबाबदारीचा विषय आहे. आज अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरील पोलिस कारवाईच्या मुद्द्यावरून होत आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमित शहा यांना पदावरून हटवण्याची मागणी केली असून या प्रकरणाच्या चौकशीसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली तपासाची मागणीही केली आहे. दुसरीकडे, केंद्र सरकारने पोलिसांनी गोळीबार केल्याचा आरोप फेटाळून केवळ अश्रुधुराचा वापर झाल्याचे म्हटले आहे. त्यामुळे या प्रकरणातील सत्य समोर आणण्यासाठी स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशीची मागणी अधिक गंभीरपणे विचारात घेणे गरजेचे आहे. विद्यार्थी हा देशाचा भविष्यकाळ आहे. त्यांच्या प्रश्नांकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेच्या चष्म्यातून पाहता येणार नाही. परीक्षा, पेपरफुटी, भरती प्रक्रिया, शिक्षणातील पारदर्शकता आणि रोजगार या प्रश्नांवर देशातील तरुणांमध्ये अस्वस्थता असेल, तर सरकारने त्यांच्या आवाजाला दडपण्याऐवजी त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. आंदोलन करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला विरोधक किंवा देशविरोधी ठरवणे ही लोकशाहीची पद्धत नाही. मात्र, आंदोलनाच्या नावाखाली हिंसा, कायदा मोडणे किंवा सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले असेल, तर त्यावर कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे. लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार आहे, तसेच कायदा-सुव्यवस्था राखण्याची सरकारची जबाबदारीही आहे. या दोन्ही गोष्टींचा समतोल राखणे हे प्रशासनाचे खरे कौशल्य आहे. त्यामुळे पोलिस कारवाई योग्य होती की अतिरेक झाला, याचा निर्णय राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा निष्पक्ष चौकशीच्या आधारे व्हायला हवा. अमित शहा हे केंद्र सरकारमधील अत्यंत प्रभावशाली नेत्यांपैकी एक आहेत. गृह मंत्रालयासारख्या महत्त्वाच्या मंत्रालयाची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. देशातील अंतर्गत सुरक्षा, कायदा-सुव्यवस्था, केंद्रीय तपास यंत्रणा आणि अनेक संवेदनशील विषय त्यांच्या मंत्रालयाच्या अखत्यारीत येतात. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले, तर त्यांना संसदेत आणि जनतेसमोर त्याची उत्तरे द्यावी लागतील. राजीनामा म्हणजे नेहमीच दोषी असल्याची कबुली नसते. अनेक वेळा राजीनामा हा नैतिक जबाबदारी स्वीकारण्याचा मार्ग असतो. तर काही वेळा राजीनामा न देणे म्हणजे सरकारला आपल्यावर पूर्ण विश्वास असल्याचे राजकीय संकेत देणे असते. त्यामुळे अमित शहा यांचा राजीनामा होणार की नाही, हा प्रश्न केवळ व्यक्तीचा नसून सरकारच्या उत्तरदायित्वाच्या राजकारणाचा आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर विरोधकांनी आता पुढचा प्रश्न उपस्थित केला आहे. जर जनतेच्या दबावामुळे एका मंत्र्याला पद सोडावे लागले, तर इतर गंभीर प्रश्नांवरही त्याच निकषाचा वापर होणार का? सरकारने या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर दिले पाहिजे. कारण लोकशाहीमध्ये जबाबदारी ही निवडक नसते; ती सर्वांसाठी समान असली पाहिजे. आज देशातील तरुण वर्ग सोशल मीडिया, रस्त्यावरची आंदोलने आणि सार्वजनिक चर्चेच्या माध्यमातून आपला आवाज व्यक्त करीत आहे. या आवाजाकडे दुर्लक्ष करणे कोणत्याही सरकारसाठी धोकादायक ठरू शकते. तरुणांच्या प्रश्नांना राजकीय रंग देण्यापेक्षा त्यांच्या मागण्यांवर ठोस निर्णय घेणे अधिक महत्त्वाचे आहे. अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या विरोधकांनीही या मुद्द्याचे राजकारण करण्यापेक्षा ठोस पुरावे आणि तथ्ये जनतेसमोर ठेवली पाहिजेत. सरकारवर गंभीर आरोप करणे सोपे आहे; पण ते सिद्ध करण्यासाठी निष्पक्ष तपासाची मागणी करणे आणि तपासाच्या निष्कर्षांची वाट पाहणे हीच लोकशाहीची जबाबदार भूमिका आहे. त्याच वेळी सरकारनेही विरोधकांच्या प्रत्येक प्रश्नाला राजकीय कटकारस्थान म्हणून नाकारण्याची भूमिका सोडली पाहिजे. सरकारला बहुमत मिळाले म्हणून प्रश्न विचारण्याचा विरोधकांचा अधिकार संपत नाही. उलट, सत्तेत असलेल्या सरकारला अधिक पारदर्शकपणे जनतेला उत्तर देणे अपेक्षित असते. आजचा खरा प्रश्न अमित शहा यांचा राजीनामा होईल का, एवढाच नाही. खरा प्रश्न असा आहे की, सरकार आपल्या निर्णयांसाठी जनतेसमोर किती उत्तरदायी आहे? विद्यार्थ्यांवर कारवाई झाली असेल तर तिची चौकशी कोण करणार? पोलिसांनी नियमांचे उल्लंघन केले असेल तर जबाबदारी कोणाची? आणि आरोप चुकीचे असतील तर सत्य जनतेसमोर कोण आणणार? या प्रश्नांची उत्तरे मिळणे अधिक महत्त्वाचे आहे. भारतीय लोकशाहीची ताकद ही सत्ताधाऱ्यांच्या लोकप्रियतेत नसून संस्थांच्या स्वायत्ततेत आणि संविधानाच्या सर्वोच्चतेत आहे. सरकार कोणतेही असो, पंतप्रधान कोणतेही असोत किंवा गृहमंत्री कोणतेही असोतसंविधान आणि लोकशाही यांच्यापेक्षा कोणीही मोठे नाही. हीच भारतीय प्रजासत्ताकाची मूलभूत भावना आहे. राजीनामा हा लोकशाहीतील अंतिम उपाय असू शकतो; परंतु त्यापूर्वी सत्य, तपास आणि जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. जर अमित शहा यांच्या मंत्रालयाच्या कारभाराबाबत गंभीर अनियमितता किंवा प्रशासनिक अपयश सिद्ध झाले, तर नैतिक जबाबदारीचा प्रश्न निश्चितच उपस्थित होईल. पण केवळ राजकीय दबावाच्या आधारे कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरवणेही योग्य नाही. आज अमित शहा यांचा राजीनामा होणार का, याचे निश्चित उत्तर देता येत नाही. सध्याच्या उपलब्ध माहितीनुसार त्यांच्या राजीनाम्याची कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. मात्र, त्यांच्या राजीनाम्याची मागणी आता राजकीय चर्चेचा प्रमुख विषय बनत आहे. सरकारने या मागणीला दुर्लक्ष करण्याऐवजी तथ्यांच्या आधारे उत्तर देणे आवश्यक आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने एक राजकीय संदेश नक्कीच गेला आहेजनतेचा दबाव आणि विद्यार्थ्यांचा आवाज पूर्णपणे दुर्लक्षित करता येत नाही. आता हाच संदेश इतर मंत्रालयांच्या कारभारालाही लागू होणार का, हे पाहणे महत्त्वाचे आहे. लोकशाहीत एक राजीनामा हा शेवट नसतो; तो सरकारच्या उत्तरदायित्वाची नवी कसोटी ठरू शकतो. अमित शहा यांचा राजीनामा झाला किंवा झाला नाही, तरी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे समाधान, परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता आणि आंदोलनांवरील पोलिस कारवाईची निष्पक्ष चौकशी हे मुद्दे कायम राहणार आहेत. एखाद्या मंत्र्याचा राजीनामा हा जनतेच्या प्रश्नांवरचा अंतिम उपाय असू शकत नाही. व्यवस्था सुधारण्यासाठी सरकारला ठोस पावले उचलावीच लागतील. शेवटी एवढेचराजीनामा हा व्यक्तीचा प्रश्न आहे, पण लोकशाहीतील उत्तरदायित्व हा संपूर्ण व्यवस्थेचा प्रश्न आहे. आज जनतेला राजीनाम्यापेक्षा सत्य हवे आहे, घोषणांपेक्षा पारदर्शकता हवी आहे आणि सत्तेपेक्षा संविधानाचा सन्मान हवा आहे. त्यामुळे अमित शहा यांचा राजीनामा होणार का, याचे उत्तर काळच देईल; पण सरकारने हे लक्षात ठेवावे की या देशात संविधान मोठे आहे, लोकशाही मोठी आहे आणि जनतेपेक्षा कोणतेही सरकार मोठे नाही.

# सारनाथला जागतिक वारसा दर्जा : बुद्धाच्या धम्मभूमीचा सन्मान, भारताच्या विवेकपरंपरेचा गौरव!




-प्रवीण बागडे




सारनाथच्या पवित्र भूमीला युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळाल्याची बातमी ही केवळ एका ऐतिहासिक स्थळाच्या गौरवाची बातमी नाही तर ती भारताच्या बौद्ध, धम्म आणि मानवतावादी परंपरेला जगाने दिलेली मान्यता आहे. ज्या भूमीवर तथागत गौतम बुद्धांनी ज्ञानप्राप्तीनंतर प्रथम धम्मचक्र प्रवर्तन केले, ज्या भूमीतून करुणा, समता, प्रज्ञा आणि अहिंसेचा संदेश जगाच्या दिशेने प्रवासाला निघाला, त्या सारनाथला मिळालेला हा सन्मान प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे. पण हा अभिमान केवळ सोशल मीडियावरील पोस्ट, अभिनंदनाचे संदेश आणि राजकीय श्रेयवादापुरता मर्यादित राहता कामा नये. सारनाथच्या दगडांमध्ये कोरलेला बुद्धाचा विचार आपण आपल्या वर्तमानात किती जिवंत ठेवतो, हा खरा प्रश्न्न आहे. सारनाथ म्हणजे केवळ पुरातत्त्वीय अवशेष नाहीत. तो भारतीय इतिहासातील एका महान वैचारिक क्रांतीचा साक्षीदार आहे. सिद्धार्थ गौतमांनी बोधगया येथे ज्ञानप्राप्ती केल्यानंतर सारनाथ येथे आपल्या धम्माचा पहिला उपदेश केला. या घटनेला इतिहासात 'धम्मचक्र प्रवर्तन' म्हणून ओळखले जाते. एका व्यक्तीच्या आत्मज्ञानाचा प्रवास तेथून पुढे संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा मार्ग बनला. बुद्धांनी माणसाला जन्माच्या आधारावर श्रेष्ठ-कनिष्ठ ठरवणाऱ्या व्यवस्थेला आव्हान दिले. कर्मकांडापेक्षा आचरणाला, अंधश्रद्धेपेक्षा प्रज्ञेला, हिंसेपेक्षा करुणेला आणि भेदभावापेक्षा समतेला महत्त्व दिले. म्हणूनच सारनाथचा जागतिक वारसा दर्जा हा बुद्धाच्या भूमीचा सन्मान असला तरी त्याहून मोठे काम आता आपल्या हातात आहे, बुद्धाचा वारसा जपण्याचे!

जगात युद्धे पेटली आहेत. धार्मिक कट्टरता वाढत आहे. माणूस माणसाच्या विरोधात उभा केला जात आहे. द्वेषाची भाषा राजकारणाच्या केंद्रस्थानी येत आहे. सोशल मीडियावर खोट्या माहितीचा आणि अफवांचा पूर आहे. अशावेळी जगाला बुद्धाची गरज आहे. बुद्धांचा धम्म हा कोणत्याही एका जात, धर्म किंवा देशापुरता मर्यादित नाही. तो मानवी दुःख समजून घेण्याचा आणि त्यातून मुक्तीचा मार्ग शोधण्याचा विचार आहे. म्हणूनच सारनाथची ओळख एका प्राचीन वास्तूइतकी मर्यादित ठेवणे म्हणजे त्या भूमीच्या ऐतिहासिक आणि वैचारिक महत्त्वावर अन्याय करणे होय. सारनाथच्या भूमीवरून निघालेला धम्म पुढे भारताच्या सीमा ओलांडून आशिया खंडाच्या अनेक देशांमध्ये पोहोचला. बुद्धाच्या विचारांनी श्रीलंका, म्यानमार, थायलंड, जपान, चीन, कोरिया, तिबेट आणि जगातील अनेक भागांतील समाजजीवनावर प्रभाव टाकला. भारतातून निघालेल्या या प्रज्ञेच्या प्रकाशाने जगाला करुणेचा आणि शांततेचा मार्ग दाखवला. आज जग भारताकडे 'विश्र्वगुरू' म्हणून पाहण्याची चर्चा करते; पण विश्र्वगुरू होण्याचा अर्थ केवळ प्राचीन गौरवाच्या कथा सांगण्यात नाही. जगाला जेव्हा द्वेषाऐवजी मैत्री, युद्धाऐवजी शांतता आणि अंधानुकरणाऐवजी विवेकाची गरज आहे, तेव्हा बुद्धाचा मार्ग जगासमोर प्रामाणिकपणे मांडणे हीच खरी विश्वगुरुत्वाची कसोटी आहे.

सारनाथचा हा गौरव भारतीय संविधानाच्या मूल्यांशीही जोडलेला आहे. कारण आधुनिक भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाच्या विचारांना नव्या सामाजिक संदर्भात पुनर्जीवित केले. बुद्धांनी प्रज्ञा, करुणा आणि समतेचा मार्ग दाखवला, बाबासाहेबांनी त्याला स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेच्या सामाजिक-राजकीय मूल्यांशी जोडले. त्यामुळे सारनाथकडे पाहताना केवळ इतिहासाकडे पाहण्यापेक्षा भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रवासाकडे पाहणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर जातिव्यवस्थेच्या अमानवी बंधनांविरुद्ध संघर्ष केला. त्यांनी शिक्षण, संविधान आणि लोकशाहीच्या माध्यमातून वंचित समाजाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला. अखेर बुद्धाच्या धम्माचा स्वीकार करून त्यांनी भारतीय समाजाला एक नवा वैचारिक पर्याय दिला. म्हणूनच सारनाथचा सन्मान हा बाबासाहेबांच्या विचारांच्या अनुयायांसाठीही विशेष अर्थपूर्ण आहे. बुद्धाने धम्मचक्र फिरवले आणि बाबासाहेबांनी आधुनिक भारतात सामाजिक समतेचे चक्र गतिमान केले, असे म्हटले तर ते अतिशयोक्ती ठरणार नाही. पण आज आपल्याला स्वतःला विचारावे लागेल. बुद्धाच्या देशात आपण बुद्धाचा विचार किती स्वीकारला आहे?

जर बुद्धाच्या नावाने उत्सव साजरे करायचे आणि त्याच वेळी जातीय भेदभाव कायम ठेवायचा असेल, तर तो बुद्धाचा सन्मान नाही. जर बाबासाहेबांच्या पुतळ्याला हार घालायचा आणि त्यांच्या संविधानिक मूल्यांना मात्र दुर्लक्षित करायचे असेल, तर ती बाबासाहेबांप्रती निष्ठा नाही. जर सारनाथला जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळाल्याचा आनंद व्यक्त करायचा, पण समाजात द्वेष आणि विषमता वाढवायची असेल, तर हा गौरव केवळ देखावा ठरेल. बुद्धाची खरी शिकवण ही माणसाला प्रश्र्न विचारण्याचे स्वातंत्र्य देते. 'तुम्ही स्वतः विचार करा, तपासा आणि मग स्वीकारा,' हा बुद्धांचा विवेकवादी दृष्टिकोन आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचा आहे. अंधश्रद्धा, चमत्कार, बुवाबाजी आणि खोट्या प्रचाराच्या काळात बुद्धाची प्रज्ञा आपल्याला वैज्ञानिक दृष्टिकोन शिकवते. आजच्या डिजिटल युगात माहिती क्षणार्धात पसरते; पण प्रत्येक माहिती सत्य असेलच असे नाही. म्हणून बुद्धाची शिकवण म्हणजे केवळ प्राचीन ग्रंथात जतन करण्याची गोष्ट नाही तर ती आजच्या समाजाच्या मानसिक आरोग्यासाठी आणि लोकशाहीच्या भविष्यासाठी आवश्यक असलेली विचारपद्धती आहे.

सारनाथचा जागतिक वारसा दर्जा मिळाल्यानंतर आता केंद्र आणि राज्य सरकारांसमोरही मोठी जबाबदारी आहे. जागतिक वारसा स्थळाचा दर्जा हा केवळ पर्यटन वाढविण्याचा मार्ग म्हणून पाहता कामा नये. पुरातत्त्वीय वारशाचे संवर्धन, पर्यावरणाचे रक्षण, स्थानिक नागरिकांचा सहभाग, ऐतिहासिक स्थळांची शास्त्रीय माहिती आणि पर्यटकांसाठी दर्जेदार सुविधा यांचा समतोल साधला पाहिजे. वारसा स्थळांचे व्यापारीकरण करताना त्यांच्या आत्म्याचा नाश होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. सारनाथला जगभरातून येणाऱ्या पर्यटकांना केवळ प्राचीन वास्तू दाखवून उपयोग नाही. त्यांना बुद्धाचा विचार समजावून सांगणे आवश्यक आहे. धम्मचक्र प्रवर्तनाचा सामाजिक अर्थ, समतेचा संदेश, करुणेचे महत्त्व आणि मानवी स्वातंत्र्याची भूमिका नव्या पिढीपर्यंत पोहोचली पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून डिजिटल संग्रहालये, बहुभाषिक माहिती केंद्रे आणि विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम विकसित केले जाऊ शकतात. कारण वारसा जतन करणे म्हणजे केवळ दगड जतन करणे नव्हे, तर त्या दगडांनी सांगितलेला विचार जिवंत ठेवणे होय.



आज सारनाथला मिळालेला जागतिक सन्मान आपल्याला एक ऐतिहासिक संधी देत आहे. बुद्धाचा भारत पुन्हा जगासमोर उभा करण्याची ही वेळ आहे. मात्र त्यासाठी घोषणा नव्हे, तर कृती आवश्यक आहे. आपल्या शाळांमध्ये विवेकवाद वाढला पाहिजे. महाविद्यालयांमध्ये चिकित्सक विचारांना प्रोत्साहन मिळाले पाहिजे. समाजात जातीय आणि धार्मिक द्वेषाला नकार दिला पाहिजे. संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये प्रत्यक्ष जीवनात उतरली पाहिजेत. सारनाथला जागतिक वारसा दर्जा मिळणे हा इतिहासाचा गौरव आहे, पण बुद्धाचा विचार आपल्या वर्तमानात जिवंत ठेवणे ही भविष्याची जबाबदारी आहे. ज्या भूमीवरून बुद्धांनी धम्मचक्र फिरवले, त्या भूमीचा सन्मान जगाने केला आहे. आता आपण त्या धम्मचक्राला आपल्या विचारांत, आचरणात आणि समाजव्यवस्थेत फिरवणार आहोत का? हा प्रश्र्न प्रत्येक भारतीयाने स्वतःला विचारला पाहिजे.

सारनाथचे दगड बोलतात, द्वेष सोडा, करुणा स्वीकारा. अंधानुकरण सोडा, प्रज्ञेचा मार्ग स्वीकारा. विषमता सोडा, समतेचा मार्ग स्वीकारा आणि बाबासाहेबांचा विचार सांगतो शिका, संघटित व्हा, संघर्ष करा! या दोन्ही संदेशांची सांगड घातली, तरच सारनाथचा जागतिक वारसा दर्जा भारतासाठी खऱ्या अर्थाने ऐतिहासिक ठरेल. अन्यथा तो केवळ एका प्राचीन स्थळाला मिळालेला सन्मान ठरेल. सारनाथला मिळालेला हा सन्मान म्हणजे केवळ भारताच्या इतिहासाचा गौरव नाही तर तो बुद्धाच्या प्रज्ञेचा, धम्माच्या करुणेचा आणि समतेच्या मानवतावादी विचारांचा जागतिक विजय आहे. आता या वारशाचे जतन केवळ दगडांमध्ये नव्हे, तर आपल्या मनात आणि समाजाच्या आचरणात करणे हीच काळाची खरी मागणी आहे!

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९२९**

# बुढा गुंडा नाम का!. मोदीजी के काम का!

रामायण महाभारतात आपण पहिल आणि वाचले असेल. विजयी होण्यासाठी वर्णसंघर्ष करतांना धर्माने अधर्माने मारले तर चालते. पण अधर्माने धर्माला मारले तर तो मोठा गुन्हा ठरतो. याच पद्धतीने देशात म्हणजे भारतात,नव्हे हिंदुस्थानांत २०१४ नंतर शेतकरी कामगार आणि विध्यार्थी यांनी न्यायासाठी केलेले जन आंदोलन कशा पद्धतीने देशद्रोही ठरविले.त्यासाठी पोलिस वर्दीत आणि या गृहस्थाचे नाव आहे भैरवसिंग मीना (६९) राहणार राज्यस्थान मधील कोटा या शहरातील एका खेड्यात राहतो.हा गृहस्थ पूर्वी राज्यस्थान मधील अजमेर एका पोलीस स्टेशन मध्ये हवालदार पदावरून ११ वर्षांपूर्वी सेवानिवृत झालेला आहे.या गृहस्थाला सरकारी पेन्शन चालू आहे. आता प्रश्र्न असा आहे जर हा म्हातारा ११ वर्षापूर्वी सेवा निवृत झाला आहे तर हा रॅपिड ॲक्शन फोर्स (Rapid Action Force - RAF) म्हणजे द्रुत कृती दल होय. हे भारताच्या केंद्रीय राखीव पोलीस दलाची (CRPF) एक विशेष शाखा आहे, जी प्रामुख्याने दंगली, गर्दी नियंत्रण आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी बनवली गेली आहे. रॅपिड ॲक्शन फोर्स च्या युनिफॉर्म मध्ये कसा? याला कोणी आणले जंतरमंतर वर? कोणाच्या सांगण्यावरून यांना आणले?। बरं हा एकटाच नाहीये,याच्यासारखे १५० गुंड आहेत जे नकली RAF बनले होते. रॅपिड ॲक्शन फोर्स ही तुकडी केंद्रीय राखीव पोलीस दलाची (CRPF)



च्या अंतर्गत काम करते जेंव्हा या म्हाताऱ्याचा युनिफॉर्म मधील फोटो सगळी कडे viral झाला तेंव्हा केंद्रीय राखीव पोलीस दलाची CRPF चे कमांडर सुधेशू बॅनर्जीकडे गेला तेंव्हा त्यांनी या म्हाताऱ्यावर कडक ॲक्शन घेण्याचे ठरवले, तेंव्हा त्यांना असे समजले की RAF च्या वर्दीत हा एकटा म्हातारा नव्हता तर असे १५० जन आहे. तेंव्हा त्यांनी त्या १५० जणांची माहिती मागवली तेंव्हा ती माहिती गृहखात्याने दिली नाही. अजूनही गृहखाते त्या १५० जणांची माहिती द्यायला टाळत आहे ! सुदेशू बॅनर्जी ने जेंव्हा त्या १५० जणांची गुप्त माहिती काढली,तेंव्हा त्यांना समजले की त्या १५० जणां मधील अर्धे अधिक गुंड आहे. जे पोलिसांच्या रेकॉर्डवर वॉन्टेड क्रिमिनल आहे,! ही फार गंभीर बाब आहे.

आर एस एस प्रणीत भाजपाचे मोदी सरकार सत्तेसाठी कोणत्याही थराला जाण्याच्या तयारीत आहे कारण जे श्रीलंका,बांगलादेश, नेपाळ मध्ये घडले ते आपल्या कडे घडले तर अशी फेक पोलीस यंत्रणा त्यांचे संरक्षण करेल त्यासाठी त्यांनी ही नकली RAF तयार ठेवली आहे.आम्ही याला मोदी शहा सुरक्षा फोर्स असे नाव दिले आहे.या नकली RAF मध्ये महिला सुद्धा आहे ज्यांचे काम आहे सुरवातीला पुरुषांना अडवायचे जर पुरुष ऐकत नसेल तर अश्या निर्दशनकारी पुरुषांवर विनयभंगाची केस टाकायची त्यांच्यावर चुकीच्या जागी स्पर्श केला. (कालच्या जंतरमंतर वर जे झाले त्यातील काही अंदोलनकावर असे गुन्हे दाखल झाले आहे) अशी नीच खेळी या हरामी आर एस एस प्रणीत भाजपाचे मोदी सरकार ने चालू केली आहे.इतके घाणेरडे राजकारण स्वातंत्र्य काळा नंतर पहिल्यांदाच या देशात चालू झाले आहे.या नकली RAF मधील गुंडाना आर एस एस प्रणीत भाजपाचे मोदी सरकारने वर्दी तर दिली पण त्यांचे नाव आणि हुद्दा असणारी नेमप्लेट लावण्याची सक्त मनायी केली आहे आणि हे आपल्यासाठी फायदेशीर आहे, मी आंबेडकरी जनतेला सांगू इच्छितो की जर कधी आपल्याला अशी विदाउट नेमप्लेट मधील वर्दीतील औलादी दिसल्या तर प्रथम यांना तुडवा कारण इगझ ने यांचे कोणतेच रेकॉर्ड ठेवले नाही.ही बिन औलादीची बेवारीस पैदाईश आहे.जे आर एस एस प्रणीत भाजपाचे मोदी सरकारच्या सांगण्यावरून ७००/८०० रु.वर काम करते आहे. हे कामगार नाही तर सर्व गुंड लोकं आहे.

आपल्या मोर्च्यात कधीतरी असे विदाउट नेमप्लेट वाले गुंड दिसतील तेंव्हा जन आंदोलन करणाऱ्यांनी यांचा योग्य तो पाहुणचार करावा.

उद्धव आणि राज ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली तेंव्हा त्यांनी सुद्धा याचं घटनेचे उदाहरण देऊन सांगितले आहे की जर २६ तारखेच्या मोर्च्यात दिल्ली सारखी परिस्थिती सरकार ने केली तर त्याला उत्तर आम्ही तसेच देऊ,तेंव्हा जन आंदोलन करणाऱ्या जनतेने सुद्धा या वर्दीतील गुंडाना घाबरण्याचे कारण नाही उलट यांना शोधून यांचा सत्कार करा. जयभिम.जय संविधान. जय भारत

सौजन्य : Sunil Wagh
संकलन :सागर रामभाऊ तायडे

## केजच्या फुलेनगर भागात कुलूप तोडून पाच लाखाचा ऐवज पळवीला




**केज/प्रतिनिधी** : केज शहरातील फुले नगर भागातीलरहिवाशी असलेले माजी सैनिक व किराणा दुकानदार दिनकर देविदास विडेकर हे सोमवारी दिनांकजुलै२०२६रोजी सकाळी संभाजीनगर येथे नौकरीला आसलेल्या मुलाच्या भेटीला गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यानी त्यांच्या चॅनलगेटचे व घराचे कुलूप तोडून किराणा दुकानातून व घरातून रोख रक्कम, व सोन्याचे दागिने मिळुन एकूण ५ लाख ५ हजार ५०० रुपयाचा ऐवज चोरून नेल्याची घटना मंगळवारी त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर मंगळवारी रात्री साडे दहा वाजता दिनकर विडेकर यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे.

माजी सैनिक दिनकर देविदास विडेकर यांचे केज येथील फुलेनगर भागात घर व किराणा दुकान आहे. सोमवारी दि. २७सकाळी ६-०० वाजता त्यांनी आपल्या घराला कुलूप लावून ते संभाजीनगर येथे नोकरी निमित्त राहात आसलेल्या मुलाला भेटण्यासाठी सहकुटुंब गेले होते. मंगळवारी ( दि. २८ ) सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान ते परत आपल्या घरी आले आसता घराच्या चॅनलगेटचे व घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने आपल्या घरात चोरी केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

दरम्यान अज्ञात चोरट्यानी किराणा दुकानातून व घरातून ३ लाख ८० हजार ऱोख रक्कमेसह, ५ ग्रॅम ची सोन्याची अंगठी, अडीच तोळे सोन्याचे जुने वापरते गंठण, २०० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या २ वाट्या, २ ग्लास, २ भाराचे चांदीचे जुने वापरते जोडवे, असा एकूण ५ लाख ५ हजार ५०० रुपयाचा रुपयाचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या प्रकरणी दिनकर देविदास विडेकर यांच्या फिर्यादी वरून मंगळवारी रात्री १०-३० वाजता अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आसून पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मन कीर्तने हे पुढील तपास करीत आहेत.

००००००००००००००००००००००००००

## स्तूप म्हणजे केवळ दगडाचा सांगाडा नाही




बौद्ध स्तूपाबद्दल असा एक सामान्य समज आहे की, तो केवळ एक गोलाकार स्मारक आहे. परंतु, प्रत्यक्षात स्तूप म्हणजे 'चालती-फिरती ध्यान ऊर्जेचे केंद्र' आहे. तो केवळ एक प्रतीक नसून, एक जिवंत आध्यात्मिक संरचना मानली जाते.

स्तूप आणि ब्रह्मांड यांचा संबंध (Cosmic Structure)

स्तूप केवळ बुद्धांच्या शरीराचेच नाही, तर संपूर्ण ब्रह्मांडाचे प्रतीक आहे. ते कसे, हे पाहूया...

चौकोनी आधार (Square base) - पृथ्वी तत्व
गोलाकार घुमट (Dome) - जल तत्व
शिखर (Spire) - अग्नी तत्व
छत्र (Umbrella layers) - वायू तत्व
शीर्ष बिंदू - आकाश तत्व

म्हणजेच, स्तूप = पंचमहाभूते + बुद्ध चेतनेचा संगम आहे.

परिक्रमा आणि ऊर्जा प्रवाह

बहुतेक लोकांना माहित आहे की स्तूपाची परिक्रमा केली जाते, परंतु ती नेहमी 'दक्षिणावर्त' (Clockwise) का असते, हे फार कमी जणांना ठाऊक आहे. ही दिशा पृथ्वीचे स्वतःभोवती फिरणे आणि वैश्विक ऊर्जेच्या प्रवाहाशी सुसंगत असते, ज्यामुळे मन नैसर्गिकरित्या शांत आणि केंद्रित होते.

सांची स्तूपाचे चार स्तंभ (Toranas)

सांची स्तूपाची चार प्रवेशद्वारे (तोरणे) म्हणजे केवळ सजावट नाही. प्रत्येक द्वार बुद्धांच्या जीवनातील चार महत्त्वाच्या टप्प्यांचे दर्शन घडवते:

जन्म
ज्ञान प्राप्ती
धम्मचक्र प्रवर्तन
महापरिनिर्वाण

आश्र्चर्याची गोष्ट म्हणजे, या स्तूपांमध्ये बुद्धांची मूर्ती कोरलेली नाही, तर त्यांना चिन्हांद्वारे (जसे की पावले, बोधीवृक्ष, धम्मचक्र) दर्शवले गेले आहे. याचे कारण म्हणजे सुरुवातीच्या बौद्ध धर्मात बुद्धांच्या 'निर्गुण' स्वरूपाची संकल्पना होती.

थोडक्यात सांगायचे तर...

स्तूप म्हणजे केवळ दगडाचा सांगाडा नाही...

तो आपल्याला सांगतो की, बुद्ध बाहेर नाही, तर आपल्या आत आहेत.

धम्म म्हणजे केवळ पुस्तक नाही, तर तो एक अनुभव आहे.

आणि स्तूप... त्या अनुभवाचे प्रवेशद्वार आहे.

नमो बुद्धाय!

**पूज्य भिक्खू महानाम ७७३८४३९८६४,**
**राजगृह बुद्ध विहार नाहुर,मुंबई**

# अर्चनाताई मोरे यांचे अमरण उपोषण लेखी आश्वासनानंतर तात्पुरत्या स्वरूपात स्थगित

## हारुणभाई इनामदार व सिताताई बनसोड यांच्या मध्यस्थीने आंदोलन अखेर मागे

**केज/प्रतिनिधी** : केज तहसील कार्यालयासमोर अर्चनाताई पिंटू मोरे यांचे सोमवारपासून दोन दिवस सुरू असलेले बेमुदत अमरण उपोषण प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर व हारुणभाई इनामदार आणि सिताताई बनसोड यांच्या मध्यस्थीने अखेर तात्पुरत्या स्वरूपात मागे घेण्यात आले आहे. अर्चनाताई मोरे यांच्या उपोषण स्थळी नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी भेट घेऊन उपोषणकर्त्यां अर्चनाताई मोरे व त्यांच्या कुटुंबासमवेत चर्चा करून त्यांच्या मागण्या जाणून घेऊन केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ व सहाय्यक पोलीस निरीक्षक असद शेख यांच्या समवेत उपोषणकर्त्या अर्चनाताई मोरे यांच्या मागण्या संदर्भात चर्चा करण्यात आली. व उपोषणकर्त्या अर्चनाताई मोरे यांना आपण आपले उपोषण तात्पुरत्या स्वरूपात स्तगित करून प्रशासनास सहकार्य करावे. अशी विनंती केल्याने सीताताई बनसोड व हारुणभाई इनामदार यांच्या विनंतीला मान देऊन अर्चनाताई मोरे व मोरे कुटुंबांनी आपले दोन दिवसांपासून सुरू असलेले अमरण उपोषण हे पोलीस प्रशासनाच्या






लेखी व तोंडी आश्वासनानंतर तात्पुरत्या स्वरूपात स्थगित केले आहे.

शासकीय विश्रामगृहाच्या शेजारील बीड रोडवरील जय भवानी मंडप सेवा केंद्र अँड डेकोरेशन या नावाचे दुकान अर्चनाताई मोरे यांचे पती पिंटू मोरे व मुलगा शुभम उर्फ राम मोरे हे चालवत आहेत. अर्चना मोरे यांचा भाऊ गोविंद किसनराव कोंबडे यांनी सदर दुकान हे एप्रिल महिन्यामध्ये आग लावुन जाळले होते. या घटनेमध्ये रोख रक्कम व इतर मंडप साहित्य आणि रघुनाथ बारगजे यांचे कृषी दुकानातील साहित्य व शेजारील मेडिकलचे जळून नुकसान झाल्या प्रकरणी केज पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१८७/२०२६ गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यातील आरोपी व तपासी अधिकारी हे केज शहरातील एका बियरबार मध्ये मद्यपान करत असतांचे सीसीटीव्ही फुटेज मधील व्हिडिओ हे शुभम उर्फ राम मोरे यांच्या निदर्शनास आले होते. तसेच सदरील प्रकरणातील आरोपी गोविंद कोंबडे हा अर्चना मोरे व त्यांच्या कुटुंबाला वारंवार शिवीगाळ करत जीवे मारण्याच्या धमक्या देत होता. त्या अनुषंगाने केज पोलीस ठाणे येथे यांच्या विरोधात अनेक गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.या घटनेची पोलिस प्रशासनाकडून कोणतीही दखल न घेता उलट या गुन्ह्यातील तपासी अधिकारी आणि आरोपी यांनी संगनमत करून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला.त्यामुळे अर्चनाताई मोरे व त्यांच्या कुटुंबांना न्याय मिळाला नाही. म्हणून अर्चनाताई मोरे यांनी गेल्या सोमवार रोजी केज तहसील कार्यालयाच्या समोर केज पोलीस ठाणे येथील गु.र.नं.१८७/२०२६ या गुन्ह्यातील आरोपी गोविंद किसनराव कोंबडे व तपासी अधिकारी राजू वाघमारे यांच्यासह इतर जन हे बियरबार मध्ये मद्यपान करतानाचे सीसीटीव्ही फुटेज तपासून संबंधित दोषीवर तात्काळ कार्यवाही करून तपासी अधिकारी वाघमारे यांना तात्काळ निलंबित करून त्यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्यात यावे.

सदरील गुन्ह्यातील आरोपी गोविंद कोंबडे याच्या विरोधातील गुन्ह्याची पार्श्वभूमी तपासून तात्काळ बीड जिल्ह्यातून हद्दपार करण्यात यावे. आरोपी गोविंद कोंबडे व त्याची पत्नी आणि तपासी अधिकारी श्री. वाघमारे यांचे कॉल डिटेल्स,सीडीआर तपासण्यात यावेत. आरोपी गोविंद कोंबडे यांच्यापासून व त्याच्या मित्र परिवाराकडून अर्चनाताई मोरे आणि त्यांच्या कुटुंबाच्या जीवितास धोका असून त्यांच्या कुटुंबाला पोलीस संरक्षण देण्यात यावे. या मागण्यासाठी बेमुदत अमरण उपोषण सुरू केले होते. हे प्रकरण अतिशय गंभीर असल्याने केजचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांच्या मध्यस्थीने व पोलीस प्रशासनाच्या लेखी व तोंडी आश्वासनानंतर अर्चनाताई मोरे यांनी त्यांचे दोन दिवसांपासून सुरू असलेले अमरण उपोषण हे तात्पुरत्या स्वरूपात स्थगित केले आहे. पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्य पोलीस निरीक्षक असद शेख, पोलीस अमलदार शिवाजी कागदे यांनी उपोषणकर्त्या अर्चनाताई मोरे यांना नारळ पाणी देत लेखी आश्वासनाचे पत्र देऊन मोरे यांना उपोषणापासून प्रावृत केले. यावेळी ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड, नगरसेविका सौ. पद्मिनी अक्का शिंदे, युवा नेते विकी लोखंडे, पत्रकार तात्या गवळी, विवेक बनसोड, युवा नेते बबलू साखरे यांच्यासह इतर नागरिक उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात मत्स्यव्यवसाय योजनांची जनजागृती; एनएफडीपी प्रमाणपत्रांचे वाटप




**लातूर/प्रतिनिधी** : राज्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्र अधिक सक्षम, आधुनिक व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. मंगळवारी लातूर येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरामध्ये या योजनांविषयी जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमामध्ये जिल्ह्यातील मत्स्यव्यावसायिकांना राष्ट्रीय मत्स्यव्यावसायिक डिजिटल प्लॅटफॉर्म (एनएफडीपी) अंतर्गत नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांना एनएफडीपी प्रमाणपत्रांचे अधिकृत वितरण करण्यात आले, ज्याच्या माध्यमातून लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ, केसीसी (केसीसी) सुविधा, विमा संरक्षण तसेच डिजिटल ओळख प्राप्त होण्यास मदत होणार आहे. तसेच कार्यक्रमात महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री मत्स्यसंपदा मिशन (सीएमएमएसआय) अंतर्गत नव्याने सुरू करण्यात आलेल्या 'ऑल-इन-वन' योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली. याद्वारे मत्स्यबीज उत्पादन, मत्स्यसंवर्धन, मत्स्यपालन, मत्स्यविक्री, मूल्यवर्धन व पायाभूत सुविधा निर्मितीसह मत्स्यव्यवसायाशी संबंधित विविध घटकांना एकाच छताखाली अनुदान उपलब्ध करून दिले जात असल्याचे सांगण्यात आले.

याशिवाय किसान क्रेडिट कार्ड, प्रधानमंत्री अपघात गट विमा योजना, ई-श्रम कार्ड, एनएफडीपी नोंदणी आणि केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे स्वरूप, पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया, बँक कर्ज सुविधा व अनुदानाबाबत तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मत्स्यव्यावसायिकांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. तसेच शासनाच्या योजनांचा अधिकाधिक लाभ घेण्यासाठी डिजिटल नोंदणी, बँक खाते संलग्नता, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि वेळेत अर्ज सादर करण्याचे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## पोलिसांच्या ताब्यातील प्रत्येक मृत्यू आता 'कोठडी मृत्यू'च!; राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी** : पोलीस कोठडीतील मृत्यूच्या प्रत्येक प्रकरणात तपास अधिक पारदर्शक, निष्पक्ष आणि जबाबदार व्हावा, यासाठी गृह विभागाने सर्वसमावेशक मार्गदर्शक नियमावली जारी केली आहे. नवीन फौजदारी कायदे तसेच सर्वोच्च न्यायालय आणि मानवाधिकार आयोगाच्या विविध निर्देशांना अनुसरून ही नवी नियमावली तयार करण्यात आली आहे. यापुढे आरोपी पोलिसांच्या प्रत्यक्ष कोठडीत असो किंवा चौकशीसाठी अप्रत्यक्ष ताब्यात असो, अशा स्थितीत मृत्यू झाल्यास तो 'कोठडी मृत्यूच' गणला जाणार असून, संपूर्ण तपासाची मदार वैज्ञानिक व डिजिटल पुराव्यांवर असणार आहे. नव्या नियमावलीनुसार, मुंबईतील कोठडी मृत्यूच्या प्रकरणांचा तपास गुन्हे शाखेकडे, तर राज्याच्या अन्य भागांतील प्रकरणांचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवणे बंधनकारक करण्यात आले आहे. कोठडीत मृत्यू घडल्यास संबंधित पोलीस ठाण्याने घटनास्थळ तात्काळ सील करून सुरक्षित करणे, 'सीसीटीएनएस' प्रणालीमध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद करणे आणि २४ तासांच्या आत राष्ट्रीय व राज्य मानवाधिकार आयोग तसेच नागरी हक्क संरक्षण विभागाला तात्काळ अहवाल सादर करणे अनिवार्य राहील.

नियमावलीनुसार कार्यकारी दंडाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घटनास्थळाचा बहुकोनीय व्हिडिओ चित्रीकरणासह पंचनामा केला जाईल. मृतदेहाचे शवविच्छेदन किमान तीन तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाकडूनच केले जाईल आणि या संपूर्ण प्रक्रियेचे ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग जतन केले जाईल. याशिवाय न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या पथकाकडून घटनास्थळाची पाहणी, ई-साक्ष्य प्रणालीद्वारे पंचनामा आणि 'गुन्हा स्थळाची पुनर्रचना' करणे बंधनकारक असेल.

- पोलीस ठाण्यांमधील पारदर्शकता वाढवण्यासाठी प्रवेशद्वार, चौकशी कक्ष, लॉकअप आणि कॉरिडॉरमध्ये नाईट व्हिजन व ऑडिओ रेकॉर्डिंग सुविधा असलेले सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे निर्देश दिले आहेत. या फुटेजचा साठा किमान १८ महिने सुरक्षित ठेवावा लागणार आहे. कॅमेरा बंद पडल्यास त्याची तात्काळ नोंद घेऊन वरिष्ठांना कळवावे लागेल. यावर देखरेखीसाठी राज्य व जिल्हास्तरावर विशेष समित्या कार्यरत असतील.

- कोठडीतील मृत्यू रोखण्यासाठी अटक केलेल्या प्रत्येक व्यक्तीची तात्काळ वैद्यकीय तपासणी केली जाईल. नागरिकांच्या मारहाणीत जखमी झालेल्या आरोपींना कोठडीत न ठेवता आधी रुग्णालयात उपचार दिले जातील, तसेच कोठडीत असताना दर ४८ तासांनी वैद्यकीय तपासणी होईल. पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्यास वारसांना १ लाख रुपये, तर संबंधित पोलिसांवर गुन्हा दाखल झाल्यास १ लाख ५० हजार रुपयांच्या आर्थिक मदतीची तरतूद कायम ठेवण्यात आली आहे.

# एचपीव्ही लसीकरण जनजागृती; आरोग्य विभागाचा उपक्रम ; एचपीव्ही लस मी घेतली आपणही घ्या..!

## संभाव्य गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगाचा धोका टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक एचपीव्ही लस घ्या-डॉ. आर. बी. मुंडे

**केज/प्रतिनिधी** :महिलांना होणारा गर्भाशयाच्या मुखाचा संभाव्य धोका टाळण्यासाठी आरोग्य विभागाकडून एचपीव्ही लसीकरण मोहिम राबविण्यात येत आहे. परंतू यासंबंधी लाभार्थी व पालकात अनेक गैरसमज पसरविण्यात आले होते. त्यामुळे तालुका आरोग्य विभागाच्या वतीने आडस येथील श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जनजागृती मोहिम राबविण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राहुल मुंडे यांनी एचपीव्ही या लसीविषयी सविस्तर माहिती देऊन शालेय मुलींच्या मनातील गैरसमज दूर केले. तसेच संभाव्य होणाऱ्या गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगाचा प्रतिबंध करण्यासाठी लसीकरण करून घेण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत कु. अक्षरा संतोष राजमाने, लक्ष्मी अशोक केकाण व जान्हवी मुरलीधर काळे या शालेय विद्यार्थीनींनी एचपीव्ही लसीचे लसीकरण करून घेतले. त्यानंतर त्यांनी मी घेतली आपणही घ्या..! असे इतर तरूणींना लसीकरण करून घेण्याचे आवाहन करत मोहिमेला प्रतिसाद दिला. यावेळी आडस प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. महादेव सांगळे, डॉ. अजय थोरात, आरोग्य सहाय्यिका श्रीमती आर. बी. मुंडे, श्रीमती महानंदा खरात, श्रीमती पी. एन. सोनवणे आरोग्य सहाय्यक विलास कोल्हे, गटप्रवर्तक श्रीमती कविता गव्हाणे, आशा श्रीमती अर्चना साबळे, निता चव्हाण, अर्चना भालेकर, परवीन शेख, जयश्री कोकाटे व मनिषा उबाळे या उपस्थित होत्या.



आडस येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एचपीव्ही लसीकरण करताना डॉ. अजय थोरात, आरोग्य सहाय्यिका श्रीमती आर. बी. मुंडे, श्रीमती महानंदा खरात व आशा श्रीमती अर्चना साबळे)

# डॉ. विवेक सौताडेकर, मनोज माने, डॉ. शिवलिंग नागापुरे व शरद चव्हाण यांचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :** साहित्य सारथी कला मंच आणि दैनिक अदिती एक्सप्रेस यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा शाल, फेटा, पुष्पहार व शुभेच्छा देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये डॉ. विवेक सौताडेकर, मनोज कालिदास माने, डॉ. शिवलिंग नागापुरे, शरद चव्हाण, प्रभारी प्राचार्य सोनवणे तसेच प्रभारी मुख्याध्यापक गजानन माने यांचा समावेश होता.

सत्कारमूर्ती डॉ. विवेक सौताडेकर यांनी हिंदी और मराठी उपन्यासों में छत्रपती शिवाजी : एक तुलनात्मक अध्ययन या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून पीएच.



डी. पदवी संपादन केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर हिंदी विषयातून संशोधन करणारे ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील पहिले आणि भारतातील चौथे संशोधक ठरले आहेत.

मनोज कालिदास माने यांची साने गुरुजी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. ते महाराष्ट्र राज्य शिक्षक प्रतिनिधी सभेचे संस्थापक अध्यक्ष तथा साने गुरुजी शैक्षणिक संकुलाचे सचिव कालिदास माने यांचे चिरंजीव आहेत.

भादा येथील जिल्हा परिषद शाळे-तील आदर्श विज्ञान शिक्षक डॉ. शिवलिंग नागापुरे यांनी लातूर जिल्ह्यात इंस्पायर अवार्ड्स मानक योजनेमुळे विद्यार्थ्यांत विकसित होणारी संशोधनवृत्ती, सृजनशीलता व सामाजिक उपयोगितेचा अभ्यास या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून शिक्षणशास्त्र विषयातील संशोधनाची सर्वोच्च पदवी विद्यावाचस्पती (पीएच.डी.) संपादन केली. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

तसेच डी.एम. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य शरद चव्हाण यांचे सुपुत्र मेघराज चव्हाण यांनी नीट (छएएढ) परीक्षेत ४७१ गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल पालक म्हणून शरद चव्हाण यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गंगाधर डिगोळे यांनी केले. सूत्रसंचालन गणेश परळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रमोद टेकले यांनी मानले.

यावेळी राष्ट्रीय आदर्श शिक्षक उमेश खोसे, महेंद्रकुमार गांधले, प्रा. श्याम कांबळे, सहशिक्षक सचिन माने, दत्ता जाधव, विनोद क्षिरसागर, विष्णुदास आमदापुरे, ओम पाटील, हरिदास कोयले, गणेश पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराजांच्या पायी दिंडीत प्लास्टिकमुक्त भारताचा संकल्प

**उदगीर/प्रतिनिधी :** गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या भक्ती स्थळ, अहमदपूर येथे जाणाऱ्या पायी दिंडी यात्रेदरम्यान सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांच्या ''आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी'' या अभियानांतर्गत पर्यावरण जनजागृतीचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. यावेळी दिंडीत सहभागी झालेल्या भाविक भक्तांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.



या प्रसंगी ''प्लास्टिकला नकार कापडी पिशवीचा स्वीकार'' हा संदेश देत प्लास्टिक कॅरीबॅगच्या वापरामुळे पर्यावरण, जलस्रोत, पशुपक्षी आणि मानवी आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती भाविकांना देण्यात आली. कापडी पिशवीचा वापर हा पर्यावरण संरक्षणासाठी प्रभावी पर्याय असल्याचे सांगून प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात प्लास्टिकला कायमचा नकार देण्याचे आवाहन करण्यात आले. उपस्थित सर्व भाविकांना प्लास्टिक कॅरीबॅगचा वापर न करण्याची शपथ देण्यात आली. श्रद्धा आणि सामाजिक जबाबदारी यांचा संगम घडवत स्वच्छ, सुंदर आणि प्लास्टिकमुक्त भारत घडविण्याचा निर्धार भाविकांनी व्यक्त केला.

या उपक्रमास त्र्यंबक आप्पा माळेवाडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुरुबस माळेवाडे, कार्यकारी संपादक मनोज पटवारी, दिंडी प्रमुख वीरभद्र तरगुडे, रतिकांत आप्पा स्वामी तसेच मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते. उपस्थितांनी या सामाजिक उपक्रमाचे मनापासून स्वागत करत पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय सहभागाची ग्वाही दिली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी सांगितले की, ''गुरुंची शिकवण केवळ अध्यात्मापुरती मर्यादित नसून समाजहित आणि निसर्गसंवर्धनाचाही संदेश देते. प्रत्येकाने प्लास्टिकचा त्याग करून कापडी पिशवीचा स्वीकार केला, तर हीच राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराजांना खरी गुरुदक्षिणा ठरेल.''

या उपक्रमामुळे दिंडीतील भाविकांमध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण झाली असून, आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## शुक्रवारी रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या पदाधिकाऱ्याचा पदग्रहण सोहळा

**उदगीर/प्रतिनिधी :** रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष ॲड. विक्रम संकाये यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांचा शुक्रवार दि. ३१ जुलै २०२६ रोजी पदग्रहण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन रोटरी क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या २०२६-२७ साठी अध्यक्षपदी ॲड विक्रम संकाये, उपाध्यक्ष पदी विजयकुमार पारसेवार व सचिवपदी डॉ. सुधीर जाधव यांची निवड करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा शुक्रवार दि. ३१ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ०६ वाजता मोरया मंगल कार्यालय येथे संपन्न होत आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लबचे प्रांतपाल जयेश पटेल, सौ. पारुल जयेश पटेल, माजी प्रांतपाल सुधीर लातुरे, नगराध्यक्षा स्वाती हुडे, रोट्रॅक्टचे डी आर आर अमित भोसले यांची उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे मुख्य प्रशासकीय अधिकारी उदगीरचे सुपुत्र अमोल बस्वराज पाटील कौळखेडकर यांचा उदगीर भूषण पुरस्काराने सन्मान होणार आहे.

या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे २०२५-२६ चे अध्यक्ष प्रशांत मांगुळकर, उपाध्यक्ष मोतीलाल डोईजोडे, सचिव विक्रम हलकीकर, प्रोजेक्ट चेअरमन गजानन चिद्रेवार, संतोष फुलारी यांच्यासह रोटरी क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी सन्मान योजना : पहिल्या टप्प्यात १६ लाख ९६ हजार शेतकऱ्यांना १३,६०० कोटींची कर्जमाफी - सहकार आयुक्त दीपक तावरे

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी सन्मान योजने'ची अंमलबजावणी वेगाने सुरू आहे. २५ जुलै रोजी या योजनेची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीत राज्यातील तब्बल १६ लाख ९६ हजार पात्र शेतकऱ्यांचा समावेश आहे. याद्वारे त्यांना १३,६०० कोटी रुपयांची कर्जमाफी दिली जाणार आहे, अशी माहिती राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी दिली.

योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीबाबत माहिती देताना सहकार आयुक्त तावरे म्हणाले, शासनाने महाआयटीच्या (MahaIT) माध्यमातून एका विशेष पोर्टलची निर्मिती केली आहे. कर्जमाफी, एकवेळ तडजोड आणि प्रोत्साहन अशा तीन महत्त्वपूर्ण घटकांवर आधारित या योजनेची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन आणि पारदर्शक ठेवण्यात आली आहे.

आधार प्रमाणीकरण आवश्यक

ज्या शेतकरी बांधवांची नावे या पहिल्या यादीत समाविष्ट आहेत, त्यांनी त्वरित आपल्या जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्रात' (CSC) जाऊन स्वतःचे आधार कार्ड किंवा यादीतील विशिष्ट क्रमांक देऊन आधार प्रमाणीकरण (Aadhaar Authentication) पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रमाणीकरण यशस्वी होताच लाभाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केली जाईल. या प्रक्रियेसाठी 'ॲग्रीस्टॅक' (AgriStack) फार्मर आयडी असणे अनिवार्य आहे. ज्या शेतकऱ्यांकडे हा आयडी नाही, त्यांना सेवा केंद्रावरच तो तत्काळ काढून दिला जाईल.

**३१ मार्च २०२६ पर्यंतच्या थकबाकीचा प्रश्न निकाली**

व्यावसायिक बँकांमधील (Commercial Banks) थकीत कर्जाबाबत (NPA खाती) शेतकऱ्यांमध्ये संभ्रम असू नये, यासाठी सहकार आयुक्तांनी स्पष्ट केले की, ३१ मार्च २०२६ पर्यंतची थकबाकीची रक्कम पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या तारखेनंतरच्या व्याजाचा भार संबंधित बँकांनी उचलण्याची जबाबदारी घेतली असल्याने शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ होणार आहे.

तक्रार निवारणासाठी जिल्हास्तरीय समिती

या प्रक्रियेदरम्यान एखाद्या शेतकऱ्याच्या नावात, बँक खाते क्रमांकात किंवा आधार क्रमांकात काही तांत्रिक चूक किंवा तफावत आढळल्यास शेतकऱ्यांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. अशा शेतकऱ्यांसाठी पोर्टलवरच थेट तक्रार (Grievance) नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या तक्रारींची दखल घेऊन त्यांचे त्वरित निवारण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून त्यांना नव्याने उभे राहण्यासाठी आर्थिक बळ देण्याच्या उद्देशाने ही योजना राबवली जात आहे. त्यामुळे लातूर, धाराशिव, हिंगोली, नांदेडसह राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी लवकरात लवकर आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण करून या ऐतिहासिक निर्णयाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहकार विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# जुने कर्ज माफ, अन् एका दिवसातच मिळणार नवे पीक कर्ज !

**नि**सर्गाचा लहरीपणा, सततच्या दुष्काळामुळं मराठवाड्यासह राज्यातील शेतकरी कायम आर्थिक संकटात असतो. या दुष्टचक्रातून बळीराजाला कायमचे बाहेर काढण्यासाठी राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना राबवण्यास सुरुवात केली आहे. २५ जुलै रोजी या योजनेची पहिली यादी जाहीर झाली आहे. राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी या योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीबाबत सविस्तर सांगितले आहे. या योजनेत केवळ कर्जमाफीच नाही, तर शेतकऱ्याला तत्काळ पुन्हा उभे करण्याची मोठी ताकद आहे. पहिल्या टप्प्यातील यादीत मराठवाडा विभागातील जवळपास सहा लाखांहून अधिक शेतकरी पात्र झाले आहेत.

**योजनेची सर्वात जमेची बाजू : अवघ्या एका दिवसात नवीन कर्ज!**

एरवी कोणतीही कर्जमाफी झाली, तरी नवीन पीक कर्ज मिळण्यासाठी बँकांचा कुलिंग ऑफ पिरियड असतो. यासाठी बँका अनेक महिने किंवा चक्क एक वर्ष वाट पाहायला लावतात. पण या योजनेत शासनाने एक मास्टरस्ट्रोक लगावला आहे. सहकार आयुक्तांनी सर्व बँकांना स्पष्ट निर्देश दिले आहेत, की या कर्जमाफीनंतर हा कुलिंग ऑफ पिरियड फक्त एका दिवसाचा असेल. म्हणजेच शेतकऱ्याने आज आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन स्वतःचे आधार प्रमाणीकरण पूर्ण केले. त्याची कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण झाली, की त्याला अवघ्या एका दिवसात नवीन पीक कर्ज मिळू शकेल. आगामी हंगामासाठी बी-बियाणे आणि खते घेण्यासाठी शेतकऱ्याला कोणाकडेही हात पसरावे लागणार नाहीत. ही या संपूर्ण योजनेची सर्वात मोठी आणि क्रांतीकारी जमेची बाजू आहे.

**पहिल्या टप्प्यात मराठवाड्याला सर्वाधिक लाभ**

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील तब्बल १६ लाख ९६ हजार (सुमारे १७ लाख) शेतकरी कर्जमुक्त होत आहेत. या माध्यमातून १३ हजार ६०० कोटी रुपयांची थेट कर्जमाफी दिली जात आहे. विशेष म्हणजे, या पहिल्या यादीत मराठवाड्याचा वाटा सर्वात मोठा आहे. जवळपास सहा लाख ३७ हजार ९३५ मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पहिल्या टप्प्यात लाभ मिळणार आहे. राज्यातील सर्वाधिक लाभार्थी असलेल्या राज्यातील पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये मराठवाड्यातील दोन जिल्ह्यांचा समावेश आहे. एकट्या जालना जिल्ह्यात एक लाख सात हजार ५०५, तर छत्रपती संभाजीनगरमध्ये एक लाख पाच हजार १२८ शेतकऱ्यांना लाभ मिळत आहे. छत्रपती संभाजी




नगर विभागातील परभणीमध्ये ७९ हजार ८५५, हिंगोलीमध्ये ४४ हजार २१३ पात्र लाभार्थी शेतकरी आहेत. सहकार विभागाच्या लातूर विभागांतर्गत बीडमध्ये सर्वाधिक ९९ हजार ६३१, त्यापाठोपाठ नांदेड ९९ हजार ५४, लातूर ५४ हजार ६६३ आणि धाराशिवमध्ये ४७८८६ शेतकरी या योजनेतून पहिल्या टप्प्यात कर्जमुक्त होत असल्याचे लातूर विभागाच्या सहकारी संस्थांचे विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी सांगितले. यासह योजनेचा लाभ सर्व शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन देखील केले.

**शेतकऱ्यांनी आता नेमके काय करायचे आहे?**

नवीन पीक कर्जाचा मार्ग मोकळा करण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी खालील सोपी प्रक्रिया त्वरित पूर्ण करणे आवश्यक आहे:

**१. सेवा केंद्रात जा :** यादीत नाव आल्यास आपले आधार कार्ड घ्या आणि त्वरित जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जा.

**२. ॲग्रीस्टॅक आयडी:** या प्रक्रियेसाठी ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी असणे अनिवार्य आहे. तुमच्याकडे तो नसेल, तर केंद्रावरच तत्काळ काढून मिळेल.

**३. रक्कम तपासा:** स्क्रीनवर तुमची ३१ मार्च २०२६ पर्यंतची थकबाकीची मुद्दल दिसेल. ती अचूक असल्यास बायोमेट्रिक (अंगठ्याचा ठसा) देऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करा.

**४. बेबाकी प्रमाणपत्र:** प्रक्रिया पूर्ण होताच तुम्हाला बेबाकी प्रमाणपत्र मिळेल आणि नवीन कर्जाचा मार्ग खुला होईल.

**दोन लाखांवरील कर्जासाठी एकवेळ समझोता**

ज्या शेतकरी बांधवांचे कर्ज दोन लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांनाही वाऱ्यावर सोडलेले नाही. त्यांच्यासाठी एकवेळ समझोता योजना आहे. रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार, तुमचे खाते एनपीए झाल्यानंतरचे सर्व व्याज माफ केले जाईल. तसेच मुद्दलातही मोठी सवलत मिळेल. सवलतीनंतर उरलेली दोन लाखांवरची रक्कम तुम्ही भरल्यास, शासनाकडून तुमचे दोन लाख रुपये माफ केले जातील.

**थोडक्यात सांगायचं तर...**

ही केवळ एक कर्जमाफी नाही. शेतकऱ्याला पुन्हा आत्मसन्मानाने उभे करण्याची एक सुसज्ज यंत्रणा आहे. जुने कर्ज माफ आणि लगेच दुसऱ्या दिवशी नवीन कर्ज, हा निर्णय कृषी क्षेत्रासाठी संजीवनी ठरणार आहे. त्यामुळे सर्व पात्र शेतकरी बांधवांनी अजिबात वेळ न दवडता त्वरित आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे. विकासाच्या या नव्या प्रवाहात सामील व्हावे !

----------------

**डॉ. श्याम टरके,**
**सहायक संचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर**

## क्षणभरात होणार होती मोठी दुर्घटना; चालकाला चक्कर, शाळेची बस डिव्हायडरवर चढली

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर शहरातील जळगाव रोड परिसरात बुधवारी शाळेच्या बसचा थरारक अपघात घडला. सुमारे ४० विद्यार्थ्यांनी भरलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या बसचा चालक गाडी चालवत असताना अचानक चक्कर आल्याने बस रस्त्यावरील दुभाजक चढून थांबली. सुदैवाने बसचा वेग कमी असल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि मोठी दुर्घटना थोडक्यात टळली.

मिळालेल्या माहितीनुसार, शाळा सुटल्यानंतर चालक विशाल शिवलिंग बागुले हे विद्यार्थ्यांना टीव्ही सेंटर परिसरातील त्यांच्या घरी सोडण्यासाठी बस घेऊन निघाले होते. पिरॅमिड चौक ओलांडून काळा गणपती मंदिरासमोर बस पोहोचताच चालकाला अचानक चक्कर आली. डोळ्यांसमोर अंधारी आल्याने त्यांचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस थेट रस्त्याच्या दुभाजकावर जाऊन चढली.

घटना घडताच बसमधील विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. अनेक चिमुकल्यांनी घाबरून आरडाओरड सुरू केली. आवाज ऐकून स्थानिक नागरिक आणि इतर वाहनचालकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी प्रसंगावधान राखत सर्व विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बसबाहेर काढले आणि त्यांना धीर दिला. घटनेनंतर बेशुद्ध पडलेल्या चालक विशाल बागुले यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती शाळा प्रशासन आणि विद्यार्थ्यांच्या पालकांना त्वरित देण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या चालकाची व्यवस्था करून सर्व ४० विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळा बसमधून सुरक्षितपणे त्यांच्या घरी पोहोचवण्यात आले. मुलांना सुखरूप पाहिल्यानंतर पालकांनी सुटकेचा निश्वास सोडला.या घटनेनंतर शाळा बसमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा तसेच बस चालकांच्या नियमित वैद्यकीय तपासणीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. चालकांच्या आरोग्य तपासणीकडे अधिक गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याची चर्चा या घटनेनंतर सुरू झाली आहे.

## लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी १४.८ मिलीमीटर पावसाची नोंद

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात २९ जुलै २०२६ रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासात सरासरी १४.८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये उदगीर तालुक्यात सर्वाधिक ४६.३ मिलीमीटर, तर निलंगा तालुक्यात सर्वात कमी ३.० मिलीमीटर पाऊस झाला आहे. तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे : लातूर- ५.४, औसा- ५.३, अहमदपूर २०.३, निलंगा३, उदगीर-४६.३, चाकूर- १६.३, रेणापूर- ६.६, देवणी- ८.३, शिरूर अनंतपाळ- ७ आणि जळकोट- ४३.२ मिलीमीटर.

## पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे 30 जुलै रोजी कवळखेड येथे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, लातूर मॉडेल करिअर सेंटर आणि उदगीर तालुक्यातील कवळखेद येथील गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा रोजगार मेळावा ३० जुलै, २०२६ रोजी सकाळी १० वाजता जी.एस.पी.एम. कॅम्पस, बोधन नगर, जळकोट रोड, कवळखेड ता. उदगीर, जि. लातूर येथे होणार आहे. या मेळाव्यात विविध नामांकित आस्थापना व उद्योजक सहभागी होणार असून, त्यामध्ये बारावी, बी.फार्म, डी.फार्म, बी.एस.सी., एम.एस.सी., बी.सी.ए., आय.टी.आय., डिप्लोमा, बी.ई. तसेच इतर शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे सर्व इच्छुक उमेदवारांनी ३० जुलै रोजी सकाळी १० वाजता मूळ शैक्षणिक कागदपत्रे, स्वतःचा रिझ्युम (बायोडाटा) आणि पासपोर्ट फोटोच्या तीन प्रतींसह मुलाखतीसाठी दिलेल्या ठिकाणी उपस्थित राहावे. लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नोकरीइच्छूक उमेदवारांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त नि. ना. सूर्यवंशी यांनी केले आहे. या मेळाव्याबाबत काही अडचण असल्यास उमेदवारांनी कार्यालयातील दत्तात्रय कांबळे (मो. ९०२८२३८४६५), लहू भंडारे (मो. ८०५५९९२९००) किंवा प्रविण वाघमारे (मो. ९९२२९२५८९५) यांच्याशी संपर्क साधण्याचा आवाहन केले आहे..

## मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत दयानंद विज्ञानमध्ये एक दिवसीय मत्स्य व्यवसाय जनजागृती व प्रशिक्षण शिबिर

**लातूर/प्रतिनिधी :** मत्स्यव्यवसाय विभाग व दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत एक दिवसीय मत्स्य व्यवसाय जनजागृती व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दि.३० जुलै २०२६, वार गुरुवार, सकाळी ठिक १०:०० वाजता करण्यात आलेले आहे.मत्स्यपालक, पारंपरिक मच्छिमार, मत्स्य सहकारी संस्थांचे सदस्य व विद्यार्थी तसेच मत्स्य व्यवसायाशी संबंधित सर्व लाभार्थ्यांसाठी आधुनिक मत्स्यपालन तंत्रज्ञानाचा लाभ मिळवून देण्यासाठी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,लातूर कार्यालयाकडून हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे.

सध्याच्या काळात मत्स्य व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे काळाची गरज बनली आहे.याच पार्श्वभूमीवर या प्रशिक्षण कार्यक्रमात आधुनिक मत्स्यपालन तंत्रज्ञान,आधुनिक जाळी व बोटींचा वापर,मत्स्य हाताळणी व काढणीनंतरचे व्यवस्थापन,मत्स्य विपणन अशा विविधांगी विषयांवर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे.या प्रशिक्षण शिबिरामुळे लातूर परिसरातील मत्स्यपालक व व्यावसायिकांना आपल्या व्यवसायाची आधुनिक पद्धतीने वाढ करण्यास मोठी मदत होणार आहे. तरी जास्तीत जास्त मत्स्यपालक आणि संबंधित घटकांनी या प्रशिक्षण शिबिरात सहभागी व्हावे,असे आवाहन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, विभागीय उपायुक्त मत्स्य व्यवसाय, लातूरचे शिरिष गाताडे,सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय तेजस्विनी करळे, विभाग प्रमुख डॉ.रवी सोळुंके व डॉ.सुरज कोल्हे यांच्यामार्फत करण्यात आलेले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.